# मंगरूळपीर तालुक्याला लागले 'टक्केवारी'चे ग्रहण?

## औषधी कंपन्यांकडून नागरिकांच्या घरांवर परवानगीशिवाय स्टिकर चिटकवण्याचा प्रकार; जनतेतून तीव्र संताप, प्रशासनाकडे कारवाईची मागणी

▶ प्रदिप देशमुख ▶

**रिसोड** - शहरासह परिसरातील नागरी व ग्रामीण भागात औषध कंपन्या परवानगी न घेता नागरिकांच्या घरांवर, शटरवर, दुकानांच्या पाट्यांवर स्टिकर व जाहिराती चिटकवल्या जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली



या बेकायदेशीर प्रकारामुळे नागरिकांत तीव्र नाराजी पसरली असून संबंधित कंपन्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी जनतेकडून होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्या नुसार, हे कंपन्यांचे प्रतिनिधी कुठल्याही पूव परवानगा शिवाय थेट घराच्या भिंती, दरवाजे, शटर यावर औषधांच्या जाहिराती असलेले स्टिकर्स चिकटवून जातात. काही घरांमध्ये कोणी नसतानाही रात्री वा सकाळी या स्टिकर्सची चिटकवणी केली जाते. परिणामी, नव्याने रंगरंगोटी केलेल्या भिंतींवर डाग पडत असून नागरिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे. विशेष म्हणजे, हे प्रकार शहरी भागातच नव्हे तर ग्राम पंचायत हद्दीतील घरे, शासनाच्या योजनेंतर्गत मिळालेले घरकुल व सार्वजनिक ठिकाणीही सर्रास सुरू असल्याचे दिसून येते. यामुळे सार्वजनिक मालमत्तेचा अपव्यय तर होतोच, परंतु नागरिकांच्या खासगी मालमत्तेवरही अतिक्रमण केल्या सारखा प्रकार घडत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक नगर परिषद, ग्रामपंचायत व जिल्हा प्रशासनाने संबंधित जाहिरात एजन्सी व औषधी कंपन्यांवर कारवाई करावी, त्यांना नोटीस पाठवून यापुढे कोणत्याही प्रकारची जाहिरात परवानगी शिवाय न करता येईल, यासाठी कठोर नियमावली तयार करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. जर ह्या प्रकारास आता आळा घातला नाही, तर भविष्यात आणखी कंपन्या अशाच पद्धतीने नागरिकांच्या खासगी मालमत्तेचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करू शकतात, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## विकासकामांची गुणवत्ता ढासळली; नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण

▶ गौरवकुमार इंगळे▶

**मंगरूळपीर** - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख व्हिजनला स्थानिक स्तरावर टक्केवारीच्या अनिष्ट प्रथेमुळे खीळ बसत असल्याची तीव्र भावना मंगरूळपीर शहरात व्यक्त केली जात आहे. शहरात सुरू असलेली विकास कामांमधील दर्जाहीनपणा, रस्त्यांच्या निकृष्ट कामांबाबत नागरिकांमध्ये संताप पसरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोक प्रतिनिधींच्या ढवळा ढवळीमुळे निर्णय प्रक्रियेवर दबाव येतो आणि कंत्राट दारांना निकृष्ट कामासाठी प्रोत्साहन मिळते.

परिणामी, नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी होणाऱ्या खर्चाचा प्रत्यक्ष उपयोग न होता त्याचे 'टक्केवारीचे वाटप' अधिकाऱ्यांपासून लोक प्रतिनिधीं मध्ये होतो, अशी जोरदार चर्चा जनतेत सुरु आहे. वर्ष २०२१ मध्ये वर्ल्ड बँक व यु एन डी पीच्या अहवालातही या संदर्भातील धक्कादायक माहिती समोर आली होती. सार्वजनिक प्रकल्पांमध्ये एकूण खर्चाच्या ८ टक्के ते २५ टक्के निधी भ्रष्टाचाराच्या विळख्यात जातो. यामध्ये १०-२०ङ निधी केवळ टक्केवारीमुळे गमावला जातो, हे गंभीर वास्तव आज मंगरूळपीर मध्ये स्पष्टपणे जाणवत आहे. शहरातील अनेक भागांतील रस्ते 'घरात शेणाचा सडा टाकावा' अशा स्थितीत आहेत. निवडणुका येतात -जातात, पण रस्त्यांची अवस्था मात्र बदलत नाही. अनेक रस्ते काही महिन्यांतच खराब होतात. देखभाल- दुरुस्तीच्या कालावधीत संबंधित कंत्राटदारा कडून काम करून घेतले जाणे अपेक्षित असते, पण अधिकारी आणि अभियंते दुर्लक्ष करत असल्याने टक्केवारीचा प्रभाव असल्याची कुजबुज आहे. राज्यभरात कामांचे बिल वेळेवर न मिळाल्यामुळे आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलणाऱ्या कंत्राटदारांची उदाहरणे वाढत आहेत. या टक्केवारीच्या साखळीत गुणवत्ता बाजूला टाकली जाते. स्वस्त व कमी दर्जाचे साहित्य वापरले जाते. नियोजन, देखरेख, वेळेत काम पूर्ण होणे - हे सारे नियम पायदळी तुडवले जातात. परिणामी, शासनाच्या निधीचा अपव्यय होतो आणि जनतेचा अपेक्षित लाभ मिळत नाही. प्रशासनात गुणवत्ता धिष्ठित कंत्राटदारांना डावलून राजकीय वरदहस्त असलेल्या धनदांडग्या व्यक्तींना प्राधान्य दिले जात आहे. काहींना तर स्वतःच्या खाणीसुद्धा असूनही ते निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून शहराच्या पायाभूत सुविधांवर थट्टा करत आहेत. शासनाच्या रुपयांच्या निधीचा गैरवापर होत असताना संबंधित विभाग डोळेझाक करतात. उलट, कंत्राटांमधील टक्केवारीचे वाटप प्रशासन व राजकीय नेत्यांना मालामाल करत असल्याचे जनतेचे म्हणणे आहे.

**शहराच्या भविष्यासाठी गंभीर इशारा!**

मंगरूळपीर नगरपरिषदेतील यापरिस्थितीमुळे शहराचा सर्वांगीण विकास थांबतो आहे. नागरी सोयी-सुविधा मिळण्याऐवजी नागरिक त्रस्त आहेत. शासनाच्या 'गुड गव्हर्नन्स' संकल्पनेला धक्का पोहोचतो आहे. यासंदर्भात वरिष्ठ यंत्रणांनी लक्ष घालून टक्केवारीवर आधारित प्रणालीला तात्काळ आळा घालणे गरजेचे ठरते.

**विकास नाही, दलाली सुरूआहे!**

शहरात सुरू असलेल्या रस्ते, गटार, इमारत बांधकामे ही प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची असून, केवळ कागदोपत्री विकासाचा डंका वाजवला जात आहे. यामागे कारण एकच - 'टक्केवारी'चाअट्टहास! ठेके मंजूर करताना, कामाचे बिल पास करताना, प्रत्येक टप्प्यावर अधिकारी, अभियंते आणि काही राजकीय नेत्यांच्या संगनमताने २०ङ ते ३० टक्के पर्यंतची लाच रक्कम उघडपणे मागितली जाते, हे अनेक कंत्राटदार आज उघडपणे सांगू लागले आहेत.

**कंत्राटदारांकडून लाच घेत शहर विक्रीवर?**

शहराच्या प्रत्येक भागात सुरू असलेली कामे म्हणजे जणू काही 'खाजगी उधारीवर विकलेले सार्वजनिक ठेके' आहेत. जे कंत्राटदार लाच देतात, त्यांनाच कामं मिळतात. दर्जा, पात्रता, अनुभव याला काहीही अर्थ उरलेला नाही. कंत्राटदारांना जणू सांगितले जाते - 'काम नको, पण हिशोब मात्र देऊन ज

**स्त्यांचा दर्जा 'शून्य'; पण टक्केवारी मात्र '१००टक्के !**

सध्या शहरातील अनेक रस्त्यांचे बांधकाम काहीच महिन्यांपूर्वी झालेले असूनही, त्यावर उखडलेले डांबर, पाण्याने भरलेले खड्डे आणि वाकडी-तिकडी नाल्या बघून हे स्पष्ट होते की, काम करताना कोणताही तांत्रिक नियम पाळला गेलेला नाही. हे सारे घडते आहे कारण टक्केवारी भरणे हेच प्राथमिक उद्दिष्ट ठेवल्याने दर्जावर कुठलीही जबाबदारी घेतली जात नाही.

**अधिकारी 'टक्केवारी'चे दलाल - जनतेचे प्रश्न कोण विचारणार?**

काही वरिष्ठ अधिकारी सध्या आपल्या 'चांदीच्या वाट्या' भरत असल्याचा आरोप जनतेतून होत आहे. नागरिकांना त्यांच्या समस्यांसाठी धावपळ करावी लागते. गटारसफाई, पथदिवे, पाणीपुरवठा, रस्ते डागडुजी - सगळीकडे हतबलता आणि अपयश. पण अधिकारी मात्र नव्या गाड्या, महागडे फोन, टूर प्लॅनिंग यामध्ये व्यस्त.

**'पैसे द्या, नाही तर काम विसरा' - अशी पद्धती!**

काही कंत्राटदारांनी खाजगीत सांगितले की कामाचे बिल मिळवण्यासाठी दरवेळी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींकडे पैसे द्यावे लागतात. दिले नाहीत तर बिल रखडवले जाते किंवा कामात त्रुटी काढून ब्लॅकलिस्ट करण्याची धमकी दिली जाते.' या 'सिस्टिमॅटिक लुटी'ङमुळे अनेक प्रामाणिक कंत्राटदार हताश झाले असून काहींनी व्यवसायच सोडला आहे. महाराष्ट्रातील इतर भागात यामुळे आत्महत्या झाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत.

**'भ्रष्टाचार-विकास युती'तून नागरी सुविधांचा मृत्यू!**

शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. गटारे तुंबलेली, ड्रेनेज ओव्हरफ्लो होत आहे. गंध पसरत आहे. हे सर्व असूनही 'विकासाचा रिपोर्ट कार्ड' मात्र छापील फलकांवर झळकतो - आणि वस्तुस्थिती लपवली जाते.

**कोण आहे यामागे? - चौकशीची मागणी बळावत आहे!**

ठेकेदार-नेते- अधिकाऱ्यांची त्रिसूत्री ज्या पद्धतीने निधीचा लिलाव करत आहे.

त्यावर स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी आता सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक करू लागले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांवर आणि राजकीय नेत्यांवर गुन्हे दाखल करून, त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात यावी, असे जनतेचे मत बनू लागले आहे.

## विश्वमांगल्य सभेच्या मातृशक्तीची भव्य कावड यात्रा उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा** - रविवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी विश्वमांगल्य सभा, कारंजा शाखेच्या वतीने आयोजित मातृशक्तीची भव्य कावड यात्रा अत्यंत भक्तिपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते कावड पूजन होऊन यात्रेचे उद्घाटन झाले. सौ. वंदनाताई मालपाणी व सौ. शिवकांताताई इन्नाणी यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



संघटन शक्ती राष्ट्रनिर्माणात ठरते प्रभावी

पवित्र सप्तनद्यांचे आवाहन करत टिळक चौकातील विहिरीच्या जलाची पूजा करून यात्रेची सुरुवात झाली. यानंतर श्री नर्मदेश्वर महादेवाला श्री शिवमहिम्न अभिषेक करण्यात आला. कावड पूजनानंतर यात्रेची वाजत-गाजत सिद्धेश्वर मंदिराकडे निघालेली कावड मिरवणूक पाहताच सर्वत्र उत्सवाचे वातावरण पसरले. यात्रेमध्ये विविध समाजातील जवळपास ११०० ते १२०० महिलांचा सहभाग होता. प्रत्येक समाजाने चौका-चौकांत पारंपरिक लोकनृत्य सादर करून यात्रेची शोभा वाढवली. बंजारा समाजाचे लोकनृत्य, दुधोरा येथील महिलांनी पावली, गुजराथी समाजाचा गरबा तसेच डमरू पथक, भजनी मंडळे, जयघोष करणाऱ्या महिला यांनी भक्तिभावाने वातावरण भारावून टाकले. भारत मातेच्या भूमिकेत एकता गायकवाड, शंकराची भूमिका प्रिया अडुळकर, पार्वतीची ओवी ढाकुलकर, गणपतीची अनवेश पायल, संत झुलेलाल यांची हरप्रीत पंजवानी यांनी भूमिका साकारत लहानग्यांचाही सहभाग लक्षणीय ठरला. सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचल्यावर २१ महिलांनी २१ कलश खांद्यावर घेऊन मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्या. त्यानंतर महादेवाला जलाभिषेक करण्यात आला. या पूजेसाठी सौ. तेजश्रीताई डहाके आणि सौ. राखीताई चव्हाण या प्रमुख पूजेस बसल्या होत्या. कार्यक्रमाची सांगता महाआरती आणि प्रसाद वाटपाने झाली. या यशस्वी आयोजनासाठी विश्वमांगल्य सभेच्या कार्यकर्त्या, शहरातील विविध सामाजिक संस्था आणि स्थानिक महिलांनी मोलाचे योगदान दिले.

## जुन्या दरावर आरोग्य विभागाची निविदा अन्यायकारक

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत आरोग्य विभागाने प्रसिद्ध केलेली ई-निविदा क्र. १/२०२५-२६ ही पूर्णपणे कामगार विरोधी, अन्यायकारक व नियमबाह्य असून ती तातडीने रद्द करण्यात यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड. संघनायक मोरे यांनी दिला आहे.



ॲड. मोरे यांचा आंदोलनाचा इशारा

सदर निविदेअंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व पथकांमध्ये एकूण ४० पदांसाठी ११ महिन्यांची कंत्राटी भरती करण्यात येणार आहे. परंतु, या भरतीसाठी वापरण्यात आलेले वेतन दरपत्रक दि. १ फेब्रुवारी २०२२ चे असून, ते आता कालबाह्य झाले आहे. विशेष म्हणजे कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी नवे दरपत्रक जाहीर करून संपूर्ण राज्यात लागू केलेे असताना, जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग अजूनही जुन्या दरावर निविदा राबवत आहे, ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे कामगारांना किमान वेतन मिळावे हा कायदेशीर व नैतिक अधिकार असून, त्यावरील कुठलीही तडजोड म्हणजे त्यांच्या पोटावर लाथ मारण्या सारखे आहे. नवीन दरांनुसार कुशल व अकुशल कामगारांना दरमहा ५ ते ६ हजार रुपयांनी अधिक वेतन मिळू शकते, परंतु जिल्हा परिषदेने जुने दर लागू करून शासकीय यंत्रणेच्या नावाखाली कामगारांच्या श्रमाचे शोषण करण्याचा प्रयत्न केला आहे. या निविदेमध्ये असेही नमूद आहे की, बँकेचे हमीपत्र ५० लाखांचे असावे, फॉर्म शुल्क १५,००० रुपये आहे आणि तीन वर्षांची सरासरी उलाढाल १ कोटींहून अधिक असावी. हे सर्व निकष सामान्य बेरोजगार सहकारी संस्था व लघु संस्था यांच्यासाठी अडथळा ठरत आहेत. यातूनच मोठ्या व दबंग ठेकेदारांना फायदेशीर ठरेल अशी रचना करण्यात आल्याचा संशय बळावतो. २०२५ चे दरपत्रक राज्यात लागू असूनही त्याचा समावेश निविदेत नाही. इतर सर्व कागदपत्रे २०२४-२५ चे मागवून दरपत्रक मात्र २०२२ चे वापरण्यात आले आहे, हा निव्वळ दुटप्पीपणा आहे. निविदा केवळ कागदोपत्री नियम पाळण्यासाठी, प्रत्यक्षात मात्र कामगारांचे शोषण करण्यासाठीच असल्याचे स्पष्ट होते. या निविदेच्या माध्यमातून बेरोजगारांचे हक्क हिरावले जात आहेत. शासकीय योजनांमध्ये गरीब व गरजू घटकांना संधी मिळावी यासाठीच सहकारी संस्थांची संकल्पना अस्तित्वात आली आहे. मात्र, अशा अटी घालून त्यांनाच बाहेर ठेवले जात आहे. या प्रकाराची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम व मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी तात्काळ दखल घेऊन निविदा रद्द करून नव्याने सुधारित अटींवर निविदा प्रसिद्ध करावी, अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा ठाम इशारा ॲड. मोरे यांनी दिला आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे प्रतिभावंत साहित्यिक होते -लोककवी विलास भालेराव

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड**- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची विचार धारा कष्टकरी, मजूर, शेतकरी यांच्या न्याय हक्क, अधिकार आणि कर्तव्याची जाणीव, वास्तववादी आणि निर्भीडपणे आपल्या शाहिरी साहित्याच्या माध्यमातून जगाच्या वेशीवर उजागर करण्याची किमया लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी केली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे प्रतिभावंत साहित्यिक होते असे उदगार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती कस्तुरी नवजीवन वेलनेस अँड फिटनेस सेंटर नालंदा नगर वाशिम येथे साजरी करताना लोककवी विलास भालेराव यांनी व्यक्त



केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन सुर्यलक्ष्मी शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था वाशिम, महाबोधी धम्म संस्कार केंद्र, नालंदा नगर वाशिम, आणि कस्तुरी नवजीवन वेलनेस अँड फिटनेस सेंटर नालंदा नगर वाशिम च्या संयुक्त विद्यमाने स्थानिक करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ५:०० वाजता मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले व उपस्थित सर्व आरोग्य सलागारांच्या वतीने वर्कआउट करण्यात आले. सदर कार्यक्रमांमध्ये जागतिक आरोग्य सल्लागार महागुरू दीपक भुते सर यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन करून तसेच आरोग्य सल्लागार राम सरोदे सर, विकास भाले सर, संगीताताई कव्हर, नितीन भालेराव, माधुरी भालेराव यांनी ऑनलाईन शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमांमध्ये आरोग्य सल्लागार गंगाधर भालेराव, संजयजी वैरागडे, रंजनाताई खोरणे, तसेच कस्तुरी नवजीवन वेलनेस अँड फिटनेस सेंटर नालंदा नगर वाशिम च्या संचालिका आरोग्य सल्लागार कस्तुरा भालेराव यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांमध्ये आरोग्य सल्लागार गोवर्धन रणबावळे , युवा शाहीर तथा संगीतकार सुमेधानंद भालेराव, अनिल बांगरे, दुर्गाताई राऊत, वर्षाताई बांगरे, संगीताताई उचित, सोनाली ताजने, सविता रणबावळे, सुनिता रणबावळे, शितल भालेराव, विनयकुमार भालेराव, सूर्या भालेराव यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यलक्ष्मी संस्थेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## महसूल सप्ताह अंतर्गत विविध कामांना आला वेग विविध महसूल मंडळांमध्ये पांदण रस्ते मोजणी सह करण्यात आले दुतर्फा वृक्षारोपण

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - तहसीलदार डॉ. संतोष यावलकर यांच्या नेतृत्वात एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट या आठवड्यात महसूल सप्ताह अंतर्गत विविध गावातील शेतकरी, गावकरी यांच्याशी संबंधित लोकाभिमुख कामाचा धडाका सुरू असून या कामी महसूल, कृषी, पंचायत आदी विभागाचे अधिकारी कर्मचारी सुद्धा धावपळ करताना दिसत आहेत.



तालुक्यातील सहाही महसूल मंडळातील शेतकऱ्यांना शेत शिवारात जाण्यासाठी व असे तसे कृषी पिके घरापर्यंत आणण्यासाठी गरजेचे असलेले पांदण रस्ते शिवाड्या यांचे विवादास्पद दावे समपचाराने सोडवणे केला प्राधान्यक्रम देण्यात आले. महसूल सप्ताह अंतर्गत मौजे सिंगडोह ते कोठारी पांदण रस्त्याची मोजणी करतेवेळी स्वतः तहसीलदार डॉ. येवलीकर जातीने हजर होते. सिंगडोह कोठारी पांधन रस्त्याच्या दोन्ही बाजूला तहसीलदार तहसीलदारांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड सुद्धा करण्यात आली. मोहगव्हाण ते जामदरा पांदन रस्ता मोजणी व दुसरपा वृक्ष लागवड नायब तहसीलदार अस्टूरे यांच्या हस्ते तथा विभागातील इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. रुद्राळा ते जामदरा पांदन रस्त्याची मोजणी व वृक्ष लागवड सुद्धा महसूल सप्ताह अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सिंगडोह, रुद्राळा, जामदरा, मोहगव्हाण, दापुरा या गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.

## केशवराज संस्थान च्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम** - केशवराज संस्थान करुणेश्वर मंदीर येथे १० ते १६ ऑगस्ट दरम्यान श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार असून, या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक, भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



या महोत्सवा दरम्यान दररोज अखंड वीणा वादन, सकाळी ५ ते६ काकडा आरती, ६ ते ८ श्री स अभिषेक, १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अ?ड. भवानीपंत काळू व गिरीजा काळू यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण, सकाळी ९ ते दुपारी १ भागवत स्वाहाःकार, शतचंडी स्वाहाःकार, दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सप्ताह, वाचक नितीन देशमुख महाराज, रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत दिपयज्ञ गायत्री परिवार, ११ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत बालक कलाकार प्रिती पाठक व संच, यांचे शास्त्रीय व सुगम संगीत, १२ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत भजन, १३ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत सुभाष महाराज खरोळा यांचे कीर्तन, १४ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० ज्ञानेश्वरी काळबांडे, झालकवाडी यांचे वारकरी कीर्तन, १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता श्री चा पालखी सोहळा, रात्री ११ वाजता जन्मसोहळा, १६ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते ११ वाजता यज्ञाची पुर्णाहुती अवभ्रुत स्नान, सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत नामदेव महाराज काकडे यांचे काल्याचे किर्तन, दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाने श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा समारोप होणार आहे. या कर्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन, लक्ष्मण जनार्दन शास्त्री व जन्माष्टमी महोत्सव समिती, केशव गोविंदराव गाडगे यांनी केले आहे.

## राशीन येथील महात्मा फुले फलक विटंबनेचा वाशिममध्ये तीव्र निषेध दोषींवर कठोर कारवाईची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - कर्जत तालुक्यातील राशीन (जि. अहमदनगर) येथे महात्मा फुले यांच्या नामफलकाची करण्यात आलेली विटंबना ही अत्यंत संतापजनक असून याविरोधात संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. याच पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात देखील आज अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत निषेध नोंदवण्यात आला आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करताना सांगितले की, 'सन २०१४ मध्ये राशीन गावात ग्रामपंचायतीच्या ठरावानंतर महात्मा फुले यांचा नामफलक गावकरी नागरिकांनी श्रमदान करून उभारला होता. मात्र २ ऑगस्ट २०२५ रोजी काही जातीयवादी समाजकंटकांनी या फलकाची तोडफोड करत विटंबना केली, जे फक्त महात्मा फुले यांच्या कार्याचा अपमान नाही, तर समाजाच्या न्याय व समतेच्या मूल्यांवरही घाव आहे.' निवेदनात पुढे म्हटले आहे की, महात्मा फुले हे भारतातील शोषित, वंचित व बहुजन समाजासाठी प्रकाशवाटा दाखवणारे क्रांतीसूर्य आहेत. त्यांच्या विचारांचा अपमान सहन केला जाणार नाही. त्यामुळे विटंबना करणाऱ्यांना त्वरीत अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कडक कारवाई न झाल्यास उभारणार आंदोलन या घटने प्रकरणी जर शासन आणि प्रशासनाने त्वरित कारवाई न केली, तर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद तीव्र आंदोलन छेडेल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. निवेदन सादर करताना प्रमुखांची उपस्थितीः निवेदन सादर करताना गजानन ठेंगडे, उषाताई वानखेडे, राम गाभणे, बालुभाऊ मुरकुटे, गजानन लांडगे, शाम दळवी, संतोष वानखेडे, अनिल चौधरी, नवनीत राऊत, शुभम वानखेडे, अनिल भडके, राम बोरा, बालाजी ठेंगडे, अजय बिटोडे, विशाल भालेराव, विनोद मेरकर, गणेश डाळ, संगीता पिंजरकर, वैष्णवी कोल्हे, सागर इंगळे आदींची उपस्थिती होती. यावेळी दिलेल्या निवेदनाच्या प्रती समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री ना. छगन भुजबळ, प्रदेश कार्याध्यक्ष समीर भुजबळ तसेच पश्चिम विदर्भ अध्यक्ष वसंतराव मगर यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.



अकोला पोलीस दलाकडून 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत

# सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्या १०० जणावर कारवाई

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

३ ऑगस्ट २०२५ रोजी, अकोला जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, तसेच सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या सुरक्षिततेसाठी अकोला पोलीस दला तर्फे श्री. अर्चित चांडक साहेब पोलीस अधीक्षक अकोला यांचे मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन प्रहार' राबविण्यात येत आहे. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना विशेष निर्देश देण्यात आले होते. या मोहिमेदरम्यान, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणारे एकूण ९८ जणांवर संबंधित पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कारवाई करण्यात आली. याशिवाय, कलम ८५, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत २ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सण-उत्सव काळात सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे, तसेच त्यातून निर्माण होणारा गोंधळ, भांडणे व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न रोखण्यासाठी अकोला पोलीसांकडून अशा विशेष मोहिमा हाती घेतल्या आहेत. पोलीस अधीक्षक यांनी सर्व ठाणेदार यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, गोंधळ घालणे, किंवा इतर कोणत्याही प्रकारचे असामाजिक कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

याबाबत माहिती देताना अकोला पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे आणि यामुळे केवळ स्वतःचीच नाही तर इतरांचीही सुरक्षा धोक्यात येऊ शकते. त्यामुळे अशा कृत्यांपासून दूर राहावे, तसेच परिसरात कुठेही मद्यपान करून गैरवर्तन होत असल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास कळवावे.अकोला पोलीस दलाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व कायदा सुव्यवस्थेसाठी पुढील काळातही अशाच प्रकारच्या मोहिमा राबविण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. तसेच, अंमली पदार्थ, अवैध मद्यविक्री, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि इतर असामाजिक प्रवृत्तीविरुद्धही व्यापक प्रमाणावर कारवाई करण्यात येणार आहे.या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार, तसेच स्थानिक नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. अकोला पोलीस प्रशासनाने याबाबत आभार व्यक्त करताना, आगामी काळात नागरिकांनी कायद्याचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## अवयव दान जनजागृतीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे मोहिम

# 'देहदान, महादान, दुसऱ्याला जीवनदान'असे यावर्षीच्या मोहिमेचे घोषवाक्य

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

अवयव प्रत्यारोपणासाठी जनजागृतीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे मोहिम सुरू करण्यात आली असून, दि. १५ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.'देहदान, महादान, दुसऱ्याला जीवनदान'असे यावर्षीच्या मोहिमेचे घोषवाक्य आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम व आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांच्या मार्गदर्शनात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बळीराम गाढवे व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या सहकार्याने ही मोहिम राबविण्यात येत आहे.

अवयवदानाच्या महत्त्वाविषयी जनजागृती करणे, अवयवदानाच्या गैरसमजांवर प्रकाश टाकणे, लोकांना अवयवदान करण्यास प्रोत्साहित करणे, अवयवदात्यांचा सन्मान करणे, गरजू रुग्णांना नवीन जीवनदान देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी गावे, वाड्या, वस्त्या या ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे. अवयवदान म्हणजे अशी प्रक्रिया



जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपित करण्यास कायदेशीररित्या परवानगी देते , एकतर दाता जिवंत असताना संमतीने, मृत्यूपूर्वी केलेल्या मृत देणगीसाठी कायदेशीर परवानगीद्वारे किंवा कायदेशीर जवळच्या नातेवाईकाच्या परवानगीद्वारे मृत देणगीसाठी परवानगी दिली जाते. देणगी संशोधनासाठी असू शकते किंवा सामान्यतः, निरोगी प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयव आणि ऊती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रत्यारोपित करण्यासाठी दान केली जाऊ शकतात. प्रत्यारोपणामध्ये मूत्रपिंड , हृदय , यकृत , स्वादुपिंड , आतडे , फुफ्फुसे , हाडे , अस्थिमज्जा , त्वचा आणि कॉर्निया यांचा समावेश होतो. काही अवयव आणि ऊती जिवंत दात्यांद्वारे दान केल्या जाऊ शकतात, जसे की मूत्रपिंड किंवा यकृताचा काही भाग, स्वादुपिंडाचा काही भाग, फुफ्फुसांचा काही भाग किंवा आतड्यांचा काही भाग, परंतु बहुतेक देणग्या दात्याच्या मृत्यूनंतर होतात. अवयवदान अनेक लोकांचे जीव वाचवू शकते. एका व्यक्तीच्या अवयवदानाने अनेक गरजू लोकांना नवीन जीवन मिळू शकते. अवयवदान करणे म्हणजे एक सामाजिक कार्य आहे. यामुळे समाजाला मदत होते आणि गरजू लोकांना आरोग्यदायी जीवन जगण्याची संधी मिळते. अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात पुनर्जन्म मिळतो, असे मानले जाते. अवयव निकामी झालेल्या किंवा गंभीर वैद्यकीय परिस्थितीत असलेल्या लोकांना अवयवदानामुळे जीवनात दुसरी संधी मिळते.

**अवयवदानाबद्दल गैरसमज :** काही लोकांना अवयवदानाच्या बाबतीत धार्मिक गैरसमज आहेत. मात्र, अनेक धर्म अवयवदानाचे समर्थन करतात. काही लोकांना असा गैरसमज आहे की अवयवदानामुळे मृत्यूनंतर अंत्यसंस्कारांना उशीर होतो. मात्र, अवयवदान प्रक्रिया कमी वेळेत पूर्ण केली जाते. काही लोकांना वैद्यकीय गैरसमज आहेत की, अवयवदान केल्यास त्यांचे शरीर पूर्णपणे निकामी होईल. परंतु, अवयवदान करताना, डॉक्टरांकडून आवश्यक ती काळजी घेतली जाते.

**अवयवदान कसे करावे:** अवयवदान करण्यासाठी, तुम्ही राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेच्या (छजढढज) संकेतस्थळावर किंवा इतर मान्यताप्राप्त अवयवदान संस्थांमध्ये नोंदणी करू शकता. अवयवदान करण्यापूर्वी, आपल्या कुटुंबातील सदस्यांशी याबद्दल चर्चा करणे महत्वाचे आहे. त्यांना आपल्या निर्णयाबद्दल माहिती देणे आणि त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. या कालावधीत सर्व आरोग्य संस्थेमध्ये, गाव, वाडी, वस्ती इत्यादी ठिकाणी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी जाऊन मोहिमेची माहिती देऊन अवयव दानाबाबत प्रोत्साहन दिले जाणार आहे.या मोहिमेत जास्तीत जास्त नागरीकानी सहभागी होउन मोलाचे दान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोनाळा येथे भव्य महाकाल कावड यात्रा महोत्सव

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

महाकाल गृप कावडयात्रा अध्यक्ष गजानन शिरोडकर, शाम बोरपी,राजेश विर्श्वचर्मा,हर्षल खंडेलवाल, गोपाल नेवारे शंकरनाथ विर्श्वकर्मा व ईतर सदस्याचे नेतृत्वात भोलेनाथ शिवभक्ताचे भव्य कावड यात्रा दुपारी बस स्टॅड वरुन सूरवात प्रथम रवीवारी वाजत गाजत महाकाल कावड यात्रा हि पुर्णा नदीवरुन जल आणन्यास गेली होती आज श्रावनातला दुसरा सोमवारी दुपारी तिन नंतर सोनाळा बस स्टॅडवर आगमन झाले ऐकतीस भरन्याची कावड यात्रेत ढोल ताशे डी जे कम बॅड पथक सगळ्या शिवभक्ताचा एकच ब्रॅड असलेला महाकाल कावड यात्रेचा पोशाख हजारो यूवकाची शिवभक्तीची कावड यात्रेतला सहभागा मूळे शोभा यात्रे मधे रंगत दिसत होती.

तर पायी पुर्णा जल आनताना शिवभक्ताचे पायाला फोडे जखमा झाल्यावर ही शिवभक्ताची भोलेकृपेमूळे सर्व आंनदात



नाचत होतै यात्रेमधे मानवी हनूमान महाकाल सोनाजी महाराज अयोद्यावाशी प्रभुराम कालीया नागाचे फनिवर विराजमान श्रीकृष्ण शिव भोलेनाथ मूर्तीचे वीशेष आकर्षनामूळे पुर्ण सोनाळा व पचक्रोशीतिल नागरीकानी माहाकाल गृपच्या कावड यात्रेचा व दर्शनाचा लाभ घेतलायावेळी सोनाळा पोलीस स्टेशनचे ठानेदार स पो नि चंद्रकातजी पाटील यांचे नेतृत्वात सोनाळा बिट अमलदार रमेश खरात गणेश राठोड क्राईम अमलदार दत्ता हूशे परमेश्वर तितरे विकास साबळे, यांचे सह शातता समीती पत्रकार बांधव याचे ऊपस्थीतीत कांवड यात्रा बदौबस्तात हल्ली शाततेत सूरु आहे.

# जिल्ह्यात आ.रणधीर सावरकर यांच्या हस्ते १४७ कावडाचे पूजन

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात कावड यात्रेची परंपरा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने वृद्धिंगत होत आहे. याच पार्श्वभूमीवर अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील १७ गावांमध्ये आणि अकोला महानगरातील आठ प्रभागांमध्ये आमदार रणधीर सावरकर यांनी आज सकाळी सहा वाजल्यापासून १४७ कावडधारकांची भेट घेऊन पूजन केले. या भेटीदरम्यान त्यांनी भाविक भक्तांमध्ये भक्तीचा उत्साह निर्माण केला आणि सनातन धर्माची पताका उंचावण्यासाठी ज्येष्ठ, मातृशक्ती आणि शिवभक्तांचे आशीर्वाद घेतले.

विशेष म्हणजे अनेक महिलांनीही कावड यात्रेमध्ये सहभागी होत भगवान शंकरावर जलाभिषेक केला. आमदार सावरकर यांनी सलग १८ तास विविध गावांना भेटी देऊन दोन दिवसांत १४७ कावडधारकांचे पूजन केले. त्यांनी बोरगाव मंजू, कापशी, लाखणवाडा,



उमरी, चिखलगाव, पातुर आणि अकोला शहरातील विविध भागातील शिवभक्तांशी संवाद साधत श्रद्धेचा आदर व्यक्त केला. या भक्तीमय यात्रेत त्यांच्यासोबत भाजपचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये तेजराव थोरात, ग्रामीण सरचिटणीस अंबादास उमाळे, माधव मानकर, राजेश नागमते, डॉ. शंकरराव वाकोडे, विवेक भरणे, विजय अग्रवाल, जयंत मसने, दिलीप मिश्रा, प्रशांत अवचार, पवन महाले, रवी गावंडे, विठ्ठल चतुरकर, पंकज वाडीवाले, मांगे, डॉ. अमित कावरे, संतोष पांडे, तुषार भिरड, विलास शेळके, मिलिंद राऊत, संदीप गावंडे, अनिल नावकार, सागर शेगोकार, अनिल मुरूमकर आणि नितीन राऊत यांचा समावेश होता. या यात्रेने संपूर्ण मतदारसंघात धार्मिक उत्साह आणि एकात्मतेचे वातावरण निर्माण केले आहे.

# दर्पण संपादक मंडळ नागपूरच्या वतीने धनंजय मिश्रा समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

■पातुर,दि ४ (प्रतिनिधी) :

पातुर येथील आमदार डॉ राहुल पाटील एज्युकेशन



कॅम्पस चे जनसंपर्क अधिकारी श्री धनंजय मिश्रा यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांचा उपराजधानी नागपूर येथे समाज भूषण पुरस्कार देऊन दर्पण संपादक मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे शेतकरी कष्टकरी माणसाविषयी असलेली आत्मीयता व त्याबद्दल केलेले विपुल लिखाण व सामाजिक कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, श्रीमंत राजे मुधोजी भोसले व आमदार संदीप जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरित करण्यात आला दर्पण संपादक मंडळाचे अध्यक्ष सुशील पांडे राजेंद्र जी पाठक व सुमित लिमसे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाशिकच्या अश्विनी पुरी यांनी केले धनंजय मिश्रा यांना मिळालेल्या पुरस्कारासाठी पातूरच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे संचालक डॉक्टर साजिद शेख प्राचार्य जयश्री काटोले व उपप्राचार्य अभय भुस्कडे डॉक्टर वसीम हरहान अमीन यांच्यासह अनेकांनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

# शेतकऱ्यांना किसान गोष्टी कार्यक्रमामधुन मार्गदर्शन



■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

तालुक्यातील मोजै येळवण येथे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत किसान गोष्टी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाकरीता प्रमुख उपस्थिती म्हणूनअखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (फळे),डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे डॉ. दिनेश पैठणकर,डॉ विकास गौड,डॉ योगेश इंगळे,कृषी विज्ञान केंद्राचे डॉ गजानन तुपकर,प्रगतिशील शेतकरी रामेश्वर वाघमारे,आत्मा यंत्रणाचे तालुका तंत्र व्यवस्थापक व्ही एम शेगोकार,सहायक कृषी अधिकारी अशोक करवते, सहा तंत्र व्यवस्थापक अर्चना पेठे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर उपस्थिती शेतकऱ्यांना डॉ.पंदेकृविचे येथील अखिल भारतीय समन्वित तण व्यवस्थापन संशोधन प्रकल्प, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.व्ही.व्ही.गौड, यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना अमरवेल किंवा अधरवेल या परोपजीवी तणाचा प्रादुर्भाव द्विदलवर्गीय पिकांवर मोठ्या प्रमाणात वाढत आहे.अमरवेल या तणाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी सामूहिकरीत्या एकात्मिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. प्रतिबंधात्मक,निवारणात्मक उपाय तसेच रासायनिक पद्धतीचा वापर फायदेशीर ठरतो याविषयी मार्गदर्शन केले. तर डॉ दिनेश पैठणकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना संत्रा पीक व्यवस्थापन करताना योग्य जमीन निवडणे,योग्य वेळी पाणी देणे,खत व्यवस्थापन,आंबिया व मृग बहार घेताना काळजी घ्यावी.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

स्थानिक भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर खुलेनाट्यगृह समोर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मातंग विकास परिषदेच्या वतीने मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निघालेल्या भव्य मिरवणूकीचे स्वागत माजी राज्यमंत्री भाऊ गुलाबरावजी गावंडे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संग्राम भैय्या गावंडे आपला माणूस डॉ अशोक ओळंबे माजी नगराध्यक्ष हरीश अलीमचंदानी नगरसेवक गिरीश गोखले बाळू पाटील ढोले यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मातंग समाज विकास परिषदेचे अध्यक्ष गणेश मानकर यांनी केले होते.

# महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी ऑनलाईन प्रवेशिका उपलब्ध

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून १ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री.चवरे यांनी नमूद केले आहे. २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२५ पासून विविध १० केंद्रांवर तर ६४ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२५ पासून आयोजित करण्यात येणार आहे. नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://mahanatyasardha.com या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात. विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशील भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरिता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.राज्यातील जास्तीत जास्त नाट्य संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन श्री. चवरे यांनी केले आहे.

# ज्ञानज्योती व वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

## १७ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

■अकोला,दि ४ (प्रतिनिधी) :

राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी घटकांतील एक ही विद्यार्थी फक्त आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात मागे पडू नये, हे ध्येय बाळगत इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत ङ्गशासकीय वसतिगृह प्रवेश योजनाङ्ग आणि ङ्गज्ञानज्योती सावित्रिबाई फुले आधार योजनाङ्ग या योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत.या योजनांचा लाभ घेण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाने प्रवेश व अर्ज प्रक्रिया सुरु केली आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ ऑगस्ट २०२५ असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी ु.हारी.ारहरळीं.ीस या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी.धुळाज यांनी केली आहे.या योजनांतर्गत गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना निवास, पोषणयुक्त आहार, शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य आणि मार्गदर्शन या स्वरूपात सहाय्य पुरविले जाते. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ताधारित शिक्षण आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. अर्जांची छाननी, निवड प्रक्रिया आणि लाभार्थ्यांपर्यंत अचूक अंमलबजावणी यामध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखली जाणार आहे, असेही इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी. धुळाज यांनी सांगितले आहे.प्रत्येक जिल्ह्यात २०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, 'ज्ञानज्योतीअंतर्गत ६०० लाभार्थी या योजनांद्वारे यंदा प्रत्येक जिल्ह्यात १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थिनींसाठी वसतिगृह प्रवेश दिला जाणार आहे. तसेच ६०० विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती योजनेच्या माध्यमातून शैक्षणिक सहाय्य दिले जाणार आहे. या योजनांचा उद्देश उच्च शिक्षणाकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामीण, आदिवासी आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना गरजेनुसार आधार देण्यासाठी असल्याचा विश्वास इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी.धुळाज यांनी व्यक्त केला आहे.

**ओबीसी विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा : अतुल सावे**

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने सामाजिक परिवर्तन घडवणारी चळवळ हाती घेतली आहे.विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तसेच महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी सांगितले.ज्ञानज्योती योजना आणि वसतिगृह प्रवेश योजनेद्वारे ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी घटकांतील विद्यार्थिनींसाठी शिक्षण, निवास, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून सुरक्षित व सक्षम अशी शैक्षणिक वाटचाल घडवून आणली आहे.या योजनांमुळे ग्रामीण व दुर्बल पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या असून त्या व्यावसायिक आणि शैक्षणिक क्षेत्रत स्वतंत्रब ओळख निर्माण करू लागल्या आहेत. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन असल्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उद्दिष्ट सामाजिक वास्तवात उतरू लागले आहे. हे केवळ योजना नाहीत, तर हजारो कुटुंबांच्या आशेचा किरण आहेत. विद्यार्थिनींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मंत्री अतुल सावे यांनी केले.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

